# तिसऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण

नोव्हेंबर २००२

१३ नोव्हेंबर २००० म्हणजेच महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, सहकार महर्षी, पद्मभूषण स्व. वसंतदादा पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून आम्ही ''**पतसंस्था परिवार**'' हे सहकारातील पाहिले मासिक मुंबई सारख्या सहकाराच्या पंढरीत सुरू केले, आणि हा हा म्हणता ३ ऱ्या वर्षात पदार्पण केले.

या दोन वर्षाच्या कालावधीत आम्ही सहकार विषयक लेख, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी प्रसिध्द केलेले जी.आर., विविध संस्थांचे कार्यक्रम, त्यांच्या निवडणुका, सहकारातील कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या इत्यादी माहिती देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्याच बरोबर सहकारी संस्था चालवित असतांना येत असलेल्या विविध अडीअडचणी कशा सोडवाव्यात, सहकारी संस्थांचे कामकाज कशाप्रकारे असावे, कर्जवाटप, कर्जवसुली, संचालक मंडळ निवडणूका, तसेच सहकारातील कार्यकर्त्यांना २१ व्या शतकातील संगणकाची माहिती देण्याचा प्रयत्न केला.

विशेषत: सहकारी संस्थांची **थकीत कर्जवसुलीची समस्या** लक्षात घेऊन आम्ही ''**पतसंस्था परिवारच्या**'' माध्यमातून ती सोडविण्याचा सुध्दा अथक प्रयत्न केला. सहकारी संस्थांना कर्जवसुली करताना येणारी मुख्य अडचण म्हणजे वेळेत न मिळणारे वसुली दाखले व मिळालेल्या वसुली दाखल्यांची वसुली करण्यासाठी वेळेत उपलब्ध न होणारे ''**विशेष वसुली व विक्री अधिकारी**'' ही समस्या ध्यानात घेऊन ''**मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या**'' माध्यमातून शासनाकडे पाठपुरावा करून वसुली दाखले वेळेत मिळणेसाठी सहकार खात्याचे उपनिबंधक, सहकारी संस्था **ह्यांना मुंबै बँकेने परसेवेवर घेऊन,** सहकारी संस्थांची कलम १०१ अन्वये सुनावणी घेऊन वेळेत वसुली दाखले मिळू लागले आहेत. त्याचप्रमाणे मिळालेल्या वसुली दाखल्यांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना नसल्यामुळे वसुलीची समस्या निर्माण झाली होती. तीही थोडीफार अडचण ''पतसंस्था परिवारने'' मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मुंबै बँकेच्या ज्या अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम १५६ नुसार वसुलीचे अधिकार मिळालेले आहेत, त्यांची संख्या अत्यंत अल्प असल्यामुळे सहकारी संस्थांच्या कर्जवसुलीचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे बहुतेक सहकारी संस्थांनी कलम १५६ चे सक्तीच्या कर्जवसुलीचे अधिकार आपल्या कर्मचाऱ्यांना मिळावेत अशी मागणी केली आहे. आणि त्यांची मागणी रास्त आहे. म्हणून आम्ही ''पतसंस्था परिवारच्या'' माध्यमातून हा प्रश्न मा. सहकार आयुक्तांकडे प्रस्तावित केलेला आहे. आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५६ चे अधिकार मागतील त्या नागरी सहकारी पतसंस्थांना देण्यात मा. सहकार आयुक्त पुढाकार घेतील असा आत्मविश्वास वाटतो.

तसेच मा. सहकार आयुक्तांनी **दि. १६/ ०९/ २००२** रोजी काढलेल्या नवीन आदेशानुसार **लेखापरिक्षण वर्गवारीमुळे** होणारी समस्या दूर करण्यासाठी तो आदेश दुरूस्त करावा अशीही मागणी आम्ही पतसंस्था परिवारच्या माध्यमातून मा. सहकार आयुक्तांकडे केलेली आहे.

अशा प्रकारे या दोन वर्षात नागरी सहकारी पतसंस्था व इतर सहकारी संस्थांचे विविध प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न अखंडीत चालू आहे. ''**पतसंस्था परिवार**'' दर महिन्यास प्रसिध्द करण्यासाठी येत असलेल्या प्रचंड व्यापातून यशस्वी मार्ग काढून ''**पतसंस्था परिवारची**'' वाटचाल अखंड ठेवली आहे. या संपुर्ण दोन वर्षात अनेक सहकारी संस्थांनी जाहिरात देऊन व सभासद बनून व हितचिंतकांनी बहुमोल सहकार्य केले, त्याबद्दल आम्ही सर्व सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे व हितचिंतकांचे सविनय आभार मानून कृतज्ञता व्यक्त करीत आहोत. असेच आपले प्रेम व सहकार्य भविष्यातही ''**पतसंस्था परिवारला**'' लाभेल असा विश्वास व्यक्त करून आपल्या सहकार्याने लावलेल्या ''**पतसंस्था परिवारचे**'' छोटेसे रोपटे, फुलवीत-फुलवीत आपणां सर्वांना सुगंधमय करील, असा प्रचंड आत्मविश्वास वाटतो.

हे ''**नुतनवर्ष व शुभ दिपावली**'' आपल्या संस्थेस, पदाधिकारी-संचालक, कर्मचारी, ठेवीदार, भागदारक, हितचिंतक व सर्व कुटुंबियांना सुख-समृध्दीचे, आरोग्यवर्धक व मन:शांतीपुर्ण जावो, हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**